# परिशिष्ठ क्रमांक १४

## अडत्या - व्यापारीची अनुज्ञप्ती मिळणेकरिता अर्ज केलेल्या इसमाने करुन देण्याचा करारनाम्याचा नमुना

2103

प्रति,

मा. सभापती / सचिव,

कृषि उत्पन्न बाजार समिती, ____________________

करारनामा करून देणार मी – आम्ही

नांव ________________________________________ वय __________

व्यवसायाचा पत्ता ____________________ राहणार ____________________

आपल्याशी आज रोजी करारनामा करुन देतो की,

१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियम) अधिनियम, १९६३ त्याखालील नियम, उपविधी व त्याखालील उपनियम मी / आम्ही संपूर्णपणे वाचले असून ते मला / आम्हास पूर्णपणे समजले आहेत व त्याप्रमाणे व त्यात पुढे वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्याप्रमाणे तसेच बाजार समितीचे झालेले व पुढे होणार ठराव, हुकुम याप्रमाणे मी / आम्ही वागण्याचे कबूल करतो.

२) वरील अधिनियम, नियम, उपविधी व त्याखालील उपनियम तसेच बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशी सर्व प्रपत्रे, नोंदवह्या मी आम्ही आवश्यक ती माहित अद्यावत लिहून ठेवीन / ठेवू. तसेच बाजार समितीस हवी असलेली माहिती वेळोवेळी फर्माविण्यात येईल, अशा नमुन्यात पुरविन / पुरवू व ही कागदपत्रे योग्य ते अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास तपासणीसाठी उपलब्ध करुन देईन / देऊ व तपासणीकामी मदत करीन/करू.

३) वरील अधिनियम, नियम व उपविधी व त्याखालील उपनियमान्वये द्यावयाच्या सर्व रक्कम मी/ आम्ही बाजार समितीकडे वेळचेवेळी संपूर्णपणे भरणा करीन/ करू.

४) मी/आम्ही व माझे/ आमचे वतीने अन्य इसमांनी केलेल्या सर्व कृत्याबद्दल संपूर्णपणे जबाबदार राहीन/ राहू.

५) बाजार समिती देणे असलेल्या फी व अन्य रकमा देण्यात चुकवाचुकव करणाऱ्यांशी तसेच अनधिकृत इसमांशी मी/ आम्ही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करणार नाही व अशा इसमांविरूध्द कायदेशीर उपाययोजना करण्यास बाजार समितीस सहकार्य करीन/करू.

६) बाजार समितीशी मी/आम्ही नेहमी सहकार्याचे धोरण ठेवीन/ठेवू. बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशा रितीने आमचे कामकाज करीन/करू. बाजारातील कोणत्याही कामकाजात अडथळा येईल अगर चालू कामकांज बंद पडेल असे वर्तन करणार नाही. तसेच मी/आम्ही व्यवसाय करीत असलेल्या बाजाराची प्रतिष्ठा व लौकिक अधिकाधिक वाढले अशा पध्दतीने मी/आम्ही कामकाज करीन/ करू.

आमचे समक्ष सही केली-

१) सही ____________________

नांव ____________________

पत्ता ____________________ सही

२) सही ____________________ दिनांक

नांव ____________________

पत्ता ____________________